# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १० मे २०१९

## महानगरपालिकांच्या पोटनिवडणुकांसाठी प्रारूप मतदार याद्यांची १७ मेस प्रसिद्धी

मुंबई, दि. १० (रानिआ): बृहन्मुंबई, उल्हासनगर, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, मालेगाव, परभणी, चंद्रपूर आणि कल्याण-डोंबिवली या महानगरपालिकांमधील २० रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीकरिता १७ मे २०१९ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, या निवडणुकांकरिता १० एप्रिल २०१९ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्या ग्राह्य धरण्यात येतील. त्याआधारावर तयार करण्यात येणाऱ्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या संबंधित ठिकाणी १७ मे २०१९ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. त्या दिवसापासून त्यावर २१ मे २०१९ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या २७ मे २०१९ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या २९ मे २०१९ रोजी प्रसिद्ध केल्या जातील.

प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इत्यादी स्वरूपाची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. हरकती व सूचनांच्या अनुषंगाने केवळ मतदार याद्यांचे विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुका, मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील दुरूस्त्या करण्यात येतात, अशी माहितीही श्री. सहारिया यांनी दिली.

**महानगरपालिकानिहाय पोटनिवडणूक होणारे प्रभाग: पुणे-** ४२अ, ४२ब (हद्दवाढ क्षेत्रासाठी), २४ब आणि १अ, **उल्हासनगर-** १ब आणि ५अ, **नाशिक-** १० ड, **परभणी-** ११अ आणि ३ड, **मालेगाव-** ६क, **चंद्रपूर-** ६ब आणि १३ब, **कोल्हापूर-** २८ आणि ५५, **कल्याण-डोंबिवली-** २६, **नवी मुंबई-** २९, **बृहन्मुंबई-** ३२, २८, ७६ आणि ८१.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)